आर.सी.एस. नं.१५/२०१७
**CNR.No.MHPU120014022016**

<u>नि.६८ खाली आदेश</u>

१. प्रतिवादी नं.१ ने दाखल केलेल्या अर्जाचे व वादीने दिलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

२. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिदाव्यातील प्रतिवादी नं.१ याने त्याच्याविरुध्द झालेला विनाकैफियत (No Written Statement) चा हुकूम रद्द करण्यात यावा यासाठी केलेला आहे. प्रतिवादीचे म्हणणे असे की, तो दुर्गम व पावसाळी भागात राहण्यास असून शेतकामामुळे त्याला कैफियत दाखल करता आला नाही. तसेच प्रतिवादीची कैफियत सदरचा दावा गुणदोषावर चालविणे गरजेचे आहे. प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर घेतले नाही तर प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल.

३. वादीने प्रस्तुतच्या अर्जास नि.७० खाली म्हणणे दिले आहे. वादीने प्रतिवादीच्या अर्जास आक्षेप नोंदविला आहे. वादीचे म्हणणे असे की, प्रतिवादीने वादीच्या प्रतिदाव्यास विलंब करण्याच्या हेतूने अर्ज दाखल केलेला आहे. तसेच प्रतिवादीने नमूद केलेली कारणे ही चुकीची व अयोग्य आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि.२१/०२/२०२१ रोजी प्रतिदाव्यातील प्रतिवादीचे त्याचे म्हणणे द्यावे असा हुकूम करण्यात आला होता. प्रतिवादीने त्याचे म्हणणे देण्याकरीताचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर प्रतिवादीविरुध्द विनाकैफियत (No Written Statement) असा आदेश करण्याचे राहून गेले आहे.

५. प्रस्तुतचा प्रतिदावा गुणदोषावर चालविणेसाठी प्रतिवादीचे म्हणणे घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी नं.१ ने त्याच्या अर्जामध्ये नमूद केलेली कारणे त्याने केलेला विलंब माफ करण्यायोग्य व समाधानकारक आहे. तसेच प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर घेतल्यास वादीस कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदरचा दावा गुणदोषावर चालविण्यास व न्यायदान करण्यास उपयुक्त होईल. प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास विलंब केलेला आहे ज्यामुळे वादीची गैरसोय झालेली आहे ज्याची भरपाई वादीस वाद खर्च देवून करता

येईल.

६.	या ठिकाणी ध्यानात घेणे गरजेचे आहे की, प्रतिवादी नं.१ विरुध्द विनाकैफियत (No Written Statement) असा आदेश पारित करण्यात आलेला नाही. त्यामुळे तो रद्द करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. निर्विवादपणे, प्रतिवादी नं.१ यास प्रतिदाव्यास त्याचे म्हणणे देण्यास विलंब झालेला आहे परंतु प्रतिवादीने नमुद केलेली कारणे लक्षात घेता सदरचा विलंब माफ करण्यायोग्य आहे. म्हणून सर्वबाबी व परिस्थिती ध्यानात घेता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचित होईल. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आला:

<u>आदेश</u>

१.	अर्ज (नि.६८)अंशतः मंजूर करण्यात आला.

२.	प्रतिदाव्यातील प्रतिवादी नं.१ यांस प्रतिवादाव्यास कैफियत देण्याची परवानगी देण्यात येते. तत्पूर्वी प्रतिदाव्यातील, प्रतिवादी नं.१ याने वादीस रु.२००/- वाद खर्च द्यावा.

सही/-
दिनांक : ०२/०२/२०२१
(ह.उ.उ.पाटील)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, भोर
जि.पुणे

## Certificate

**"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order.**
**Name of the Steno : A. A. Shaikh.**
**Court Name : H.U.U. Patil**
**$2^{nd}$ Jt. C.J.J.D., Bhor, Dist. Pune.**
**Date : 02/02/2021**
**Order signed by presiding officer on : 02/02/2021**
**Order uploaded on : 02/02/2021.**